## <u>सी.सी.ए. क्र.०६/२०२० मधील निशाणी क्रमांक १७ वरील आदेश</u>

विवाद करणार याने सदरचा अर्ज हा प्रतिवादींविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ३९ नियम १ नुसार प्रतिवादी यांना तूर्तातूर्त मनाई आदेश देणेसाठी केलेला आहे.

२. **<u>विवाद करणार यांच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** : –

वादी हे प्रतिवादी संस्थेव्दारे सर्वसंमतीने केलेल्या ठरावाच्या आधारे प्रतिवादी संस्थेचे सदस्य आहे. विवाद करणार हा प्रतिवादी संस्थेचा वैध सदस्य आहे. प्रतिवादी संस्थेतील कार्यकारी सदस्य हे आर्थिक फायदा घेण्याच्या उद्देशाने विवाद करणार यांना संस्थेमधून बाहेर काढण्याचा तसेच सदस्यत्व तृतीय पक्षाकडे हस्तातंरित करण्याचा प्रयत्न करीत आहे. विवाद करणार यांनी प्रतिवादी संस्थेत बेकायदेशिररित्या सुरु असलेला कारभाराबाबत तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर संबंधीत अधिका–याने दिनांक २७.०९.२०२१ रोजी प्रतिवादी संस्थेला आदेश दिले होती की प्रतिवादी संस्था व इतर सदस्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस वादी यांना देण्यात येवून त्यांना सभेला उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात यावी. परंतु, प्रतिवादी संस्थेने विवाद करणार यांना संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याची परवनगी दिली नाही. प्रतिवादी संस्थेने संस्थेचे सभासद नसलेल्या व्यक्तिंना देखील संस्थेच्या सभेची नोटीस पाठवित आहेत तसे करणे बेकायदेशीर आहे. दिनांक २९.०५.२०२२ रोजी संस्थेची सर्वसाधारण सभा होती, परंतु तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्या दिनांक २७.०६.२०२१ रोजीच्या आदेशानंतरही विवाद करणार यांना प्रतिवादी संस्थेतर्फे कोणतीही सुचना देण्यात आलेली नाही. विवाद करणार यांनी दिनांक १६.०५.२०२२ रोजी तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २७.०९.२०२१ च्या आदेशाच्या प्रतिसह अर्ज दाखल केला होता. विवाद करणार यांनी दिनांक २३.०५.२०२२ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद तसेच सहाय्यक सहनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे संबंधीत प्रतिवादी संस्थेच्या गैरव्यवहाराबाबत अर्ज दाखल करण्यात येवून संबंधीत अधिका–यांनी कोणतीही दखल घेतली नाही. प्रतिवादी संस्थेचे कार्यकारी सभासद बेकायदेशीरित्या आर्थिक लाभ घेण्यासाठी नवीन सभासद समाविष्ट करण्यासाठी विवाद

करणार यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत आहेत तसेच प्रतिवादी संस्थेची कार्यकारिणी प्लॉट वाटपासाठी संस्थेची विशेष बैठक घेण्याचे नियोजन करीत आहेत सबब विवाद करणार यांनी प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाई आदेश प्रतिवादी यांना देणेसाठी प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

३. प्रतिवादी यांनी निशाणी १६ वर आपले म्हणणे देवून प्रस्तुतचा अर्ज नाकारला आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार, वादी हे प्रतिवादी संस्थेचे कायदेशीर आणि वैध सदस्य नाहीत म्हणून सदरचा विवाद हा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या तूरतूदी नुसार दाखल करता येत नाही. दिनांक २८.०३.२०२१ रोजी प्रतिवादी संस्थेच्या सर्वसाधारण सभेत विवाद करणार यांना संस्थेच्या रुकॉर्डमधून काढून टाकण्यात आले आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले की, प्रस्तुत अर्जातील कथने चुकीचे आहे. दिनांक २९.०५.२०२२ रोजी झालेली सभा केवळ संस्थेच्या कायेदशीर आणि वैध सदस्यांसाठी असल्यामुळे विवाद करणार यांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आली नाही. प्रतिवादी संस्थेने दिनांक २९.०५.२०२२ रोजी केवळ सिडकोला जमीन हस्तांतरित करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन केले होते आणि ती ठरावानुसार घेण्यात आली होती. तसेच त्याप्रमाणे कोणतेही नवीन सदस्य समाविष्ट करण्यात आले नव्हते. सभा आयोजित करण्यापूर्वीच प्रतिवादी यांनी विवाद करणार यांना संस्थेच्या नोंदीणीतून काढून टाकण्यात आले होते. सदरचा प्रस्ताव हा उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्यासमोर सादर केला आहे व अद्याप पावेतो प्रकरण निकालासाठी राखीव आहे. या परिस्थितीत विवाद करणार यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्याचा अधिकार नाही. विवाद करणार यांनी दाखल केला प्रस्तूतचा अर्ज बेकायदेशीर असून नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वर नमूद वादी व प्रतिवादी यांच्या कथनावरुन व उपलब्ध अभिलेखावरुन खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होय |
| २. | तुलनात्मक न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे काय ? | अंशतः होय |

| | | |
|---|---|---|
| ३. | तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | अंशतः होय |
| ४. | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

५. **वादीतर्फे दाखल केलेले कागद –**

| अ.नं. | कागदांचे वर्णन | निशाणी | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सभासद कार्यकारणी ठराव | ३/१ | – |
| २. | नोटिस व प्रारूप मतदार यादी | ३/२ | १५.११.२०१७ आणि १४.०९.२०१८ |
| ३. | ठरावावरील आक्षेप पत्र | ३/३ | १३.०९.२०१९ ०८.११.२०१९ व १८.११.२०१९ |
| ४. | तालुका उपनिबंधक सहकारी संस्था औरंगाबाद यांचे पत्र | ३/४ | १७.१२.२०१९ |
| ५. | उपनिबंधक, सहकारी संस्था औरंगाबाद यांचेकडील आदेश. | १४/१ | २७.१०.२०२० |
| ६. | उपनिबंधक, सहकारी संस्था औरंगाबाद यांचेकडील आदेश. | १४/२ | ०१.१२.२०२० |
| ७. | उपनिबंधक, सहकारी संस्था औरंगाबाद यांचेकडील आदेश. | १४/३ | २७.०९.२०२१ |
| ८. | नोटीस. | १४/४ | ०६.०३.२०२१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | नोटिस | १४/५ | २८.०३.२०२१ |

६. **<u>प्रतिवादीतर्फे दाखल केलेले कागद</u> –**

| **अ.नं.** | **कागदांचे वर्णन** | **निशाणी** | **दिनांक** |
|---|---|---|---|
| १ | ठराव | २३/१ | २८.०३.२०२१ |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रं. १ बाबत –**

७. वादी यांचे कथनानुसार, वादी हा प्रतिवादी संस्थेचा सदस्य आहे. याउलट प्रतिवादी यांचे कथनानुसार वादी हा प्रतिवादी संस्थेचा सदस्य नाही. प्रस्तुत प्रकरणी वादी हा प्रतिवादी संस्थेचा सदस्य आहे किंवा कसे ही बाब प्रस्तुत दावा गुणदोषांवर चालवून निकाली होणार आहे, सद्य स्थितीत वादी हा प्रथमदर्शनी प्रतिवादी संस्थेचा सदस्य आहे किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे. वादी यांनी आपल्या कथनांना पुष्टी देणेकरीता नमूना ई ३ दाखल केले आहे, त्याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी क्रमांक २८ वर प्रस्तुत वादी यांचे नाव दिसून येत आहे, तसेच प्रथमदर्शनी सदरची यादी मध्ये प्रारूप मतदार यादी प्रसिद्धी वेळी एकूण मतदार सभासद ६२ नमूद आहे, तसेच प्रारूप मतदार यादी प्रसिद्धी वेळी एकूण पात्र मतदार सभासद ५२ नमूद आहे. तसेच वादी यांनी आपल्या कथनांना पुष्टी देणेकरीता अभिलेखावर निशाणी उपनिबंधक सहकारी संस्था यांनी पारित केलेल्या आदेशाची प्रत सादर केली आहे, त्याचे अवलोकन केले असता सदरचा आदेश दिनांक २७.०९.२०२१ रोजी पारित केल्याचे दिसून येते. तसेच प्रस्तुत वादी हे प्रतिवादी संस्थेचे सभासद असल्यामुळे दिनांक ३०.०९.२०२१ रोजी होणाऱ्या सभेस उपस्थित राहू द्यावे असे मा. उपनिबंधक सहकारी संस्था यांनी नमूद केल्याचे दिसून येत आहे.

८. अभिलेखावर दाखल कागदपत्रांवरून प्रथमदर्शनी वादी हे प्रतिवादी संस्थेचे सभासद असल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुतचा विवाद हा दिनांक २२.०९.२०१९ रोजी चे सभेचे कार्यवृत्त हे बेकायदेशीर आहे असा जाहीर ठराव मिळणेसाठी तसेच निरंतर मनाई आदेश

मिळणेसाठी सादर केला आहे. सबब, प्रथमदर्शनी वादी हे प्रतिवादी संस्थेचे सदस्य दिसून येत असल्याने प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता वादीला प्रथमदर्शनी केस आहे असा निष्कर्ष काढणे न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.१ बाबत मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ व ३ बाबत</u> –**

९. वर नमूद बाबींचा व उपलब्ध अभिलेखावरील कागदपत्रांचा विचार करता वादीचे बाजूने प्रथमदर्शनी केस आहे हे वादीने सिध्द केले आहे. सबब, न्यायाचा समतोल कोणाच्या बाजूने आहे तसेच, तूर्तातूर्त मनाई आदेश न दिलेस वादी यांचे कधीही पैशाने भरुन न येणारे नुकसान होणार आहे का, हे पाहणे गरजेचे आहे.

१०. वर कथन केलेप्रमाणे प्रथमदर्शनी, वादी हे प्रतिवादी संस्थेचे सभासद असल्याचे दिसून येत आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जाने स्थगिती आदेशाची मागणी केली आहे. परंतु कश्या बद्दल स्थगिती हवी आहे, तसेच सध्या काय स्थिती आहे (ज्याबद्दल स्थगिती मागत आहेत त्याची) याचा कोणताही पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही, अथवा कोणतेही कथन केलेले नाही. सबब स्थगिती चा आदेश देणे न्यायोचित नाही.

११. तसेच वादी यांनी प्रस्तुत अर्जाने दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्लॉटस ची वाटणी करू नये अशी मागणी देखील केलेली आहे. वादी यांनी प्लॉटस ची वाटणी करू नये अशी मागणी केली आहे, परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी प्रतिवादी हे प्लॉटस ची वाटणी करत असलेबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही, तसेच प्रस्तुत विवादातील विनंती मध्ये प्लॉटस बाबत कोणतीही मागणी केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही, सबब सदर मागणी मंजूर न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होवू शकते, तसेच वादीची गैरसोय देखील होवू शकते असे दिसून येत नाही. सबब, प्रस्तुत मागणी मान्य करणे न्यायोचित दिसून येत नाही.

१२. तसेच वादी यांनी प्रस्तुत अर्जाने कोणतीही सभा घेण्यापूर्वी त्यांना प्रतिवादी संस्थेने नोटिस द्यावी तसेच त्यांना सदर सभेत भाग घेऊ द्यावा अशी देखील मागणी केली आहे. वर नमूद केले प्रमाणे वादी हे प्रथमदर्शनी संस्थेचे सभासद दिसून येत आहे. वादी यांना संस्थेतून काढून टाकण्याबाबतचा ठराव हा कायदेशीर आहे अथवा बेकायदेशीर हे प्रस्तुत दावा गुणदोषांवर चालून निकाली ठरणार आहे. सद्य स्थितीत वादी हे प्रतिवादी संस्थेचे प्रथमदर्शनी

सभासद दिसून येत असल्यामुळे त्यांना सभेची नोटिस प्रतिवादी यांनी पाठवणे व त्यांना सभेत भाग घेऊ देणे प्रथमदर्शनी न्यायोचित दिसून येत आहे. तसे न झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होवू शकते, तसेच वादीची गैरसोय देखील होवू शकते असे दिसून येत आहे. सबब न्यायाचा तराजू वादीचे बाजूने असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. याउलट वादी यांना सभेची नोटिस प्रतिवादी यांनी पाठविली व त्यांना सभेत भाग घेऊ दिला तर प्रथमदर्शनी प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. सबब, मी मुद्दा क्र.२ व ३ बाबत अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे व मुद्दा क्र.४ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा तुर्तातुर्त मनाई (निशाणी क्रमांक १७) अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी संस्थेच्या होणाऱ्या कोणत्याही सभेची नोटिस वादी यांना द्यावी तसेच त्यांना सभेमध्ये भाग घेऊ द्यावा असा तूर्तातूर्त आदेश देणेत येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by SAYALI ASHOK SHENDGE
Date: 2022.12.31 16:29:19 +0530

**ठिकाण** – औरंगाबाद **(एस.ए. शेंडगे MH03123)**

**दिनांक** – १५.१२.२०२२ **न्यायाधीश, सहकार न्यायालय औरंगाबाद**